नियमित दिवाणी दावा क्र. २५१/२०२१
CNR No. MHOS080007802021
संभाजी वि. किसन व इतर

**<u>निशाणी क्र. ५ खाली आदेश पारीत</u>**

वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे.

**<u>वादीच्या अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की</u>** –

**०२.** मौजे चिंचोली–रेबे, ता. लोहारा, जि. धाराशिव येथील जमीन गट क्रमांक ४०/४ क्षेत्र ०१ हे. ३७ आर ही जमीन वादी यांना महाराष्ट्र शासनाने सिलींग कायदयाप्रमाणे दिनांक १६/०४/१९७६ रोजी तहसीलदार यांच्या आदेश क्रमांक ७६ प्रमाणे प्रतिबंधात्मक मालक घोषीत करुन वादीच्या कब्जेवहिवाटीमध्ये दिलेली असुन सदर जमीनीची चतुःसिमा **पुर्वेस** – गोविंद सुदामा गंभीरे यांची जमीन, **पश्चिमेस**– सास्तुर गावाची शिवार व शिवरस्ता, **दक्षिणेस**– हरिबा सुदामा गंभीरे यांची जमीन व **उत्तरेस**–भागवत मधुकर मोरे यांची जमीन आहे. सदर मिळकतीस यापुढे सोईकरीता **'दावा मिळकत'** असे संबोधण्यात येईल.

**०३.** वादीचे पुढे असे कथन आहे की, दिनांक १६/०४/१९७६ रोजी तहसीलदार यांच्या आदेश क्रमांक ७६ प्रमाणे वादीला प्रतिबंधात्मक मालक घोषीत करुन दावा मिळकत वादीच्या कब्जेवहिवाटीमध्ये दिलेली आहे. तेव्हापासुन वादी हा दावा मिळकतीचा मालक व कबजेवहिवाटदार आहे. वादीचे नाव ७/१२ उता–याला नोंद झालेले आहे. वादी व प्रतिवादी क्रं १ व ४ यांचे वडील शाहुजी संभाजी कांबळे यांचे नाव दावा मिळकतीवर नजरचुकीने वादीच्या वडिलांच्या जागेवरती लावण्यात आले. त्यानंतर वादी यांनी महसुल कर्मचारी व अधिकारी यांना सदर चुकीची नोंद दुरुस्ती करणेबाबत विनंती केली. त्यावरुन नोंद दुरुस्ती होऊन वादीचे नाव ७/१२ उता–यावर लागलेले आहे.

**०४.** वादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादींचा दावा मिळकतीशी काही एक हक्कसंबंध नाही. प्रतिवादी हे मनुष्यबळाचा गैरफायदा घेऊन दावा मिळकतीवरती अतिक्रमण करुन बेकायदेशीरपणे कब्जा घेण्याच्या प्रयत्नात आहेत, दावा मिळकतीवरील पिकाचे नुकसान करणे, वादींना शिवीगाळ करणे व जिवे मारण्याची धमकी देऊन मानसीक व शारिरीक त्रास देत आहेत. दिनांक १६/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास वादी ट्रॅक्टर घेऊन दावा मिळकतीत मशागतीचे काम करीत असताना प्रतिवादींनी वादीस पेरणी करण्यापासुन अडविले. वादी व साक्षीदारांनी प्रतिवादींना समजावण्याचा प्रयत्न केला. वादी यांनी प्रतिवादींविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली व जिल्हाधिकारी यांच्याकडे देखील लेखी तक्रार पाठविली. त्यामुळे वादीस सदरचा दावा दाखल करण्यास व तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल करण्यास भाग पडले. तरी शेवटी तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह मंजुर करण्याची विनंती केली.

**०५.** दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्रमांक १ ते ५ हे दाव्यात हजर झाले व त्यांची कैफियत व म्हणणे अनुक्रमे निशाणी क्रं. २८ व ३० वरती दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादी व प्रतिवादी क्रं. १ ते ५ हे एकत्र अवभिक्त कुटुंबाचे सदस्य आहेत. वादीने या अगोदर प्रतिवादींविरुध्द नि.दि.दा. क्रं. ३४९/२०१६ हा दावा मिळकतीबाबत निरंतर मनाई हुकुम मिळणेबाबत दाखल केला होता, जो की न्यायालयाने फेटाळलेला आहे. तसे असताना देखील वादीने परत सदरचा दावा दाखल केला आहे. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची असल्याने सदरचा दावा करण्याचा वादीला काही एक अधिकार नाही. वादी व प्रतिवादी क्रं. १ व ४ यांचे वडील कै. शाहुजी संभाजी कांबळे यांना दावा मिळकत दिनांक १६/०४/१९७६ साली महाराष्ट्र सरकार सिलींग वितरण आदेश ३५/७६ अन्वये वाटप झालेली आहे. त्यानुसार त्यांचे वडील दावा मिळकतीचे मालक व कब्जेवहिवाटदार होते. त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर दावा मिळकत वादी व प्रतिवादी हे मालकी नात्याने कब्जेवहिवाटीत आहेत. अदयाप सदर दावा मिळकतीच्या वादी व प्रतिवादीमध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. असे असताना वादींनी तलाठी यांच्याशी संगनमत

करुन ७/१२ उता–यावरती बोगसपणे स्वतःच्या नावाची नोंद लावली आहे. वादी हे प्रतिवादींना दावा मिळकतीतुन बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत.

**०६.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी क्रं. १ व ४ चे वडील शाहुजी संभाजी कांबळे यांनी आपले मुलाचे नाव हे आपल्या वडिलाचे नाव म्हणजेच संभाजी ठेवले होते, त्यामुळे वादीचे नाव संभाजी शाहुजी कांबळे असे आहे. वादी व प्रतिवादी क्रं. १ व ४ यांच्या वडिलांच्या निधनानंतर वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीमध्ये हक्कसंबंध असल्याने वादीचा दावा चालु शकत नाही. वादींनी दाव्यात वादीची बहीण कांताबाई माधव डावळे हिला आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट केलेले नाही. तसेच वादीने प्रतिवादींविरुध्द यापुर्वी ही दावा मिळकतीसंदर्भात निरंतर मनाई हुकुमाचा दावा दाखल केला होता, त्यामुळे सदर दाव्यास Res judicata ची बाधा येत आहे. त्यामुळे वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

**०७.** दावा, लेखी कैफियत, निशाणी क्र. ५ मधील कथनांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय? | नाही. |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे का? | नाही. |
| ३ | तुर्तातुर्त मनाई हुकुम अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय? | नाही. |
| ४ | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

# कारणमिमांसा

**०८.** वादीतर्फे खालील कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत.

| अनुक्रमांक | कागदपत्रांचे विवरण |
|---|---|
| १. | पो.स्टे. लोहारा येथे वादींनी दिलेला अदखलपात्र तक्रारीची प्रत, |
| २. | जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना वादींनी दिलेला तक्रारीची प्रत, |
| ३. | मौजे चिंचोली, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद येथील गट क्रमांक ४०/४ चा ७/१२ उता-याची छायांकित प्रत, |
| ४. | मौजे चिंचोली, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद येथील सर्व क्रमांक ४० चा ७/१२ उता-याची सत्यप्रत, |
| ५. | मौजे चिंचोली रेबे, ता. लोहारा येथील सिलींग वाटपाची यादीची छायांकित प्रत, |
| ६. | फेरफार क्रमांक १०६ चा उता-याची छायांकित प्रत, |
| ७ | कब्जा हक्काची रक्कम वसुलीचे पत्राची प्रत, |
| ८ | मौजे चिंचोली, ता. लोहारा येथील जमीन गट क्रमांक ४०/४ चा ७/१२ उता-याची सत्यप्रत, |
| ९ | मौजे चिंचोली, ता. लोहारा येथील जमीन गट क्रमांक ४०/४ चा नमुना ८-अ उता-याची सत्यप्रत. |

**०९.** प्रतिवादींतर्फे खालील कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत.

| अनुक्रमांक | कागदपत्रांचे विवरण |
|---|---|
| १. | फेरफार क्रमांक १०६ चा उता–याची सत्यप्रत, |
| २. | तहसीलदार, लोहारा येथे प्रतिवादीने दाखल केलेल्या अपीलाची छायांकित प्रत. |

**१०.** वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. दावा, लेखी कैफियत, निशाणी क्र. ५ चा अर्ज, म्हणणे आणि कागदपत्रांचे अवलोकन केले.

**११.** तात्पुरता मनाई हुकुम अर्ज निकाली काढणेसाठी प्रथमतः वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय, न्यायाचा समतोल हे कोणाच्या बाजुने आहे आणि जर अर्ज नामंजुर झाल्यास वादीस नुकसान होणार आहे काय, याबाबी पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

**<u>मुददे क्रमांक १ ते ३ करीता</u>** –

**१२.** वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे एकत्रीतरित्या चर्चीले आहेत.

**१३.** वादीची अशी केस आहे की, दावा मिळकत ही त्यास महाराष्ट्र शासनाने सिलींग कायदयाप्रमाणे प्रतीबंधात्मक मालक घोषित करुन सन १९७६ साली दिलेली आहे व तेव्हापासुन वादी हा दावा मिळकतीचा कायदेशीर मालक व कब्जेवहिवाटदार झाला आहे. याउलट, प्रतिवादींचा बचाव असा आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्रं. १ व ४ यांचे वडील शाहुजी संभाजी कांबळे यांना सिलींग कायदयानुसार सन १९७६ साली दिलेली होती. त्यामुळे सदर मिळकत ही केवळ वादीची नसुन वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांच्या एकत्र कुटुंबाची आहे.

**१४.** वादींनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ अभिलेखावर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी दिसुन येते की, दावा मिळकत फेरफार क्रमांक १०६ अनुसार वादीच्या नावे नोंद झालेली आहे. अभिलेखावर सदर फेरफार क्रमांक १०६ ची सत्यप्रत दाखल आहे. सदर फेरफाराचे बारकाईने अवलोकन केले असता दावा मिळकत ही सावजी संभाजी यांना सिलींग कायदयाप्रमाणे वितरण झाल्याचे दिसुन येते. सदर फेरफार मध्ये वादीच्या नावाची नोंद दिसुन येत नाही. करीता वादीने दाखल केलेला ७/१२ उतारा याक्षणी विश्वाहार्य वाटत नाही. सदर फेरफार क्रमांक १०६ हा रद्द होणेबाबत किंवा त्यामध्ये नावाची दुरुस्ती होणेबाबत आजतागायत वादीने संबंधीत अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्याचे अभिलेखावरुन दिसुन येत नाही.

**१५.** वादीने अभिलेखावर दावा मिळकतीचा जुना ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. सदर ७/१२ उता–यावर वादीच्या नावामध्ये खाडाखोड केल्याचे दिसुन येते. सदर खाडाखोड कशामुळे झाली हे वादीने प्रथमदर्शनी स्पष्ट केलेले नाही व फेरफार क्रं. १०६ मधील नावाची दुरुस्ती केल्याबाबतचा कोणताही दस्त अभिलेखावर दाखल नाही. तसेच वादीने अभिलेखावर सिलींग कायदयाअंतर्गत जमीन वाटप भुधारकाची यादीची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर यादीचे अवलोकन केले असता अनुक्रमांक ९६ वरती वादीच्या नावाची नोंद दिसुन येते. परंतु वादीने त्याबाबतचे प्रमाणित प्रत किंवा त्याच्या सत्यप्रती अभिलेखावरती दाखल केलेल्या नाहीत. मुळतःच फेरफार क्रमांक १०६ मध्ये वादीच्या हक्कात दावा मिळकत वितरण झाल्याचे नमुद नसल्यामुळे सदर भुधारकाची यादी व जुना ७/१२ उतारा याक्षणी वादीस उपयुक्त होणार नाही. वादीस दावा मिळकत सिलींग कायदयाअंतर्गत मिळाली व त्यानुसार तो दावा मिळकतीचा मालक व कब्जेवहिवाटदार झाला ही बाब पुराव्यानिशी वादीने सिध्द करणे आवश्यक आहे. करीता प्रथमदर्शनी वादीने दावा मिळकतीवर त्याचा कब्जा असल्याचे सिध्द केलेले नाही.

**१६.** प्रतिवादींनी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा वरील नोंद दुरुस्त होऊन सावजी उर्फ शाहुजी संभाजी कांबळे यांच्या नावाची नोंद होऊन त्यानंतर त्यांच्या कायदेशीर वारसदार यांच्या नावाची नोंद करणेबाबत तहसीलदार, लोहारा यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जाची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे.

**१७.** प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीने यापुर्वी दावा मिळकतीसंदर्भात दिवाणी दावा क्रमांक ३४९/२०१६ या प्रतिवादींविरुध्द दाखल केला होता व सदर दावा न्यायालयाने फेटाळला आहे. परंतु प्रतिवादींनी याबाबत कोणतेही कागदपत्र अभिलेखावरती दाखल केलेले नाही व तसेच प्रस्तुत दाव्यास त्यामुळे Res judicata ची बाधा येते, ही बाब याक्षणी विवेचन करणे योग्य होणार नाही.

**१८.** वादीने निशाणी क्रं. ३७ च्या यादीप्रमाणे दयानंद भालचंद्र मोरे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे कथन केले आहे की, वादी हे दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत व प्रस्तुत साक्षीदार हा वादीचा शेजारी आहे. वास्तविकता वर विवेचन केल्याप्रमाणे वादीने प्रथमदर्शनी त्याचा ताबा कागदपत्राआधारे सिध्द केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत शपथपत्र वादीस उपयुक्त नाही.

**१९.** वादीने मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायर्निवाडा **सीमा अरशद झहीर ..वि.. मुन्सीपल कॉर्पोरेशन, स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) नंबर ९४७९/२००५, निकाल दिनांक ०५-०५-२००६** यावर आपल्या केसची भिस्त ठेवली आहे. सदर न्यायर्निवाडयाचे बारकाईने अवलोकन केले असता प्रस्तुत केसचे व वरील नमुद न्यायर्निवाडयातील तथ्य विभन्न आहेत. त्यामुळे प्रस्तुत न्यायर्निवाडयाचा वादीस उपयोग होणार नाही.

**२०.** प्रतिवादींनी मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायर्निवाडा **अन्नाथुला सुधाकर ..वि.. पि. बुच्चीरेड्डी, सिव्हील अपील नंबर ६१९१/२००१, निकाल दिनांक २५/०३/२००८** यावर आपल्या केसची भिस्त ठेवली आहे. प्रस्तुत न्यायर्निवाडयामध्ये असे निरीक्षण करण्यात आले की, *'जर दावा मिळकतीच्या मालकीबाबत वाद असेल तर केवळ मनाई हुकुमाचा दावा चालविणे जोगा नाही व वादीने मालकी घोषित करणेबाबत दावा करणे आवश्यक आहे'.* प्रस्तुत न्यायनिवाडयाचे या अंतरीम क्षणी प्रतिवादींना उपयोग होणार नाही.

**२१.** वरील सर्व विवेचनावरुन मी या मतास आलो आहे की, वादीने प्रथमदर्शनी केस ही त्याच्या बाजुने असल्याचे सिध्द केलेले नाही. त्यामुळे वादीच्या हक्कात न्यायाचा समतोल देखील नाही. जर अर्ज नामंजुर झाला तर वादीचे नुकसान होईल असे प्रथम दर्शनी दिसुन येत नाही. करीता मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो व खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. या अर्जाचा खर्च मुळ दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

सही/-

दिनांक १०/०१/२०२४. (एस.एस. कळसकर)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लोहारा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : R.M. Kokare |
| Court Name | : Shri. S.S. Kalaskar, CJJD Lohara. |
| Date | : 10.01.2024 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 10.01.2024 |
| Judgment uploaded on | : *12*.01.2024 |